SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in,
विद्यार्थी विकास विभाग

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

Prof. Dr. R. V. Gurav
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ कं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/963 दि. 13 JUL 2022

प्रति,
मा. प्राचार्य/प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषयः– "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविण्याबाबत...
संदर्भः– महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क संकीर्ण 8222/प्र. क.161/सां.का.4 मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रायल, मुंबई – 4000 032 यांचे दि. 30 जून, 2022 रोजीचे पत्र...

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रांन्वये, महाराष्ट्रातील सर्व शाळा/विद्यापीठ व महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यामधून दि. 09 ऑगस्ट, 2022 रोजी सकाळी 11.00 वाजता एकाच वेळी राष्ट्रगीत गायनाचे आयोजन करणेबाबत कळविले आहे.

तरी दि. 09 ऑगस्ट, 2022 रोजी सकाळी 11.00 वाजता आपले महाविद्यालयात व अधिविभागात एकाच वेळी राष्ट्रगीत गायनाचे आयोजन करणेत यावे.

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
विद्यार्थी विकास

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत
“स्वराज्य महोत्सव”उपक्रम राबविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. १६१/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ३० जून, २०२२**

**वाचा :-** १) या विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४, दिनांक २० जून, २०२२
२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र.सांकासं/१४०६, दिनांक २७ मे, २०२२

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, देशात सर्वत्र "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत सुरू राहणाऱ्या या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम, विविध पातळीवर आयोजित करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्यातही या उपक्रमांतर्गत विविध पातळीवर कार्यक्रमांचे आयोजन सुरू आहे. सदर महोत्सवाच्या आखणी, नियोजन व प्रभावी अंमलबजावणी याकरिता केंद्र शासनाच्या धर्तीवर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली धोरण समिती तसेच मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांच्या अध्यक्षतेखाली कोअर समिती व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी समिती व मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आल्या आहेत. दि.१७.०२.२०२२ रोजीच्या कोअर समितीमधील बैठकीत समितीच्या मान्यवर सदस्यांनी “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” या उपक्रमांतर्गत आयोजित करावयाच्या कार्यक्रमासंदर्भात विविध सूचना केल्या होत्या. या सुचनेपैकी एक महत्त्वाची सूचना म्हणजे स्वातंत्र्याचा “स्वराज्य महोत्सव” साजरा करावा, अशी होती. त्यास अनुसरुन राज्यात दिनांक ९ ऑगस्ट, २०२२ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत (अ) राज्यस्तरावर, (ब) जिल्हा स्तरावर, (क) तालुका स्तरावर, (ड) ग्रामस्तरावर "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दिनांक १२ मार्च, २०२१ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत “आजादी का अमृत महोत्सव” या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने सर्व राज्यांना कळविले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये “भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” साजरा करण्याबाबत शासन निर्णय/शासन परिपत्रक / शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरुपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने भारतीय

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ९ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये राज्यात "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत विविध उपक्रम / कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत (अ) राज्यस्तर, (ब) जिल्हास्तर, (क) तालुका स्तर, (ड) ग्रामस्तरावर आयोजित करावयाच्या विविध उपक्रम / कार्यक्रम यांचे स्वरुप परिशिष्ट "अ", "ब", "क" व "ड" मध्ये निश्चित केले आहे. त्यानुसार "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत विविध कार्यक्रम / उपक्रमाचे यशस्वीरित्या जास्तीत-जास्त जनसहभागातून आयोजन करण्यात यावे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२०२२०६३०१४२५५०२८२३** असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**सोबत – परिशिष्ट – अ, ब, क, ड**

VILAS RAMRAO THORAT

Digitally signed by VILAS RAMRAO THORAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, pseudonym=2908C178C06A08E995849046F8BCFB7325B57851, serialNumber=CB03C92B399CC89310BF1378C184D97A4B7B9B98E926EA8E71DD7BC9CB273631, cn=VILAS RAMRAO THORAT
Date: 2022.06.30 17:07:20 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) / मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व पोलीस आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सर्व आयुक्त, महानगर पालिका
१२. सर्व मुख्याधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१३. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१४. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१६. निवड नस्ती, सां.का.४

## (शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. १६१/सां.का.४, दि. ३० जून, २०२२ सोबतचे परिशिष्ट)

## "स्वराज्य महोत्सव " अंतर्गत राज्य स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन

## परिशिष्ट- अ

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा | अमंलबजावणी करणारे अधिकारी / कर्मचारी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | समुह राष्ट्रगान | महाराष्ट्रातील सर्व शाळा / विद्यापीठ व महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यामधून दिनांक ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता एकाच वेळी राष्ट्रगीत गायन होईल. सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यामध्ये सामील होतील. तसेच राज्यातील नागरिकांनाही या वेळी ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी उभे राहून राष्ट्रगीत गायनास्तव आवाहन करावे. यामुळे या उपक्रमाव्दारे एक विश्वविक्रम करता येईल. | सामान्य प्रशासन विभाग<br>- शालेय शिक्षण विभाग<br>- उच्च व तंत्र शिक्षण विभाग | |
| २ | आयकॉनिक सांस्कृतिक कार्यक्रम | १५ ऑगस्ट रोजी एन.एस.डी.एस. डोम गिरगाव या ठिकाणी हा कार्यक्रम प्रस्तावित आहे. ५०० कलाकार व आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हा भव्य कार्यक्रम साकारला जाईल. तीन मजली स्टेज तयार करुन आकर्षक प्रकाश योजना, नेपथ्य व सजावट करण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र ते आजचा महाराष्ट्र हा प्रवास उलगडून दाखविण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, जिजाऊ माँसाहेब इ. थोर व्यक्तीमत्वांपासून ते आतापर्यंतच्या थोर व्यक्तींचा महाराष्ट्राच्या जडणघडणीतील सहभाग यावर प्रकाश टाकण्यात येईल. या मध्ये खालील बाबींवर भर देण्यात येईल:-<br>१.भारतीय स्वातंत्र्यात महाराष्ट्राचे योगदान<br>२.संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महाराष्ट्र निमिर्ती<br>३.साठ वर्षात महाराष्ट्राने केलेली प्रगती<br>४.महाराष्ट्राचे कला व संस्कृती वैभव<br>५.महाराष्ट्र नाट्य व चित्रपट<br>६. महाराष्ट्राची सर्वांगीन प्रगती<br>७.भविष्यातील महाराष्ट्र<br>८.महाराष्ट्रातील अनसंग हिरोज्<br>९.समाजसुधारकांचा महाराष्ट्र<br>१०.महाराष्ट्राची भक्ती संस्कृती व लोककला | सांस्कृतिक कार्य संचालनालय | सांस्कृतिक कार्य विभाग |
| ३ | विधानसभा व विधान परीषद एकत्र बैठक | विधानभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये विधानसभा व विधान परिषदेच्या सदस्यांसाठी ९ ऑगस्ट रोजी एकत्र बैठक आयोजित करणे. या बैठकीमध्ये भारतरत्न, पद्मविभुषण व महाराष्ट्र भूषण पुरस्कार्थी, नाटक, चित्रपट व लोककला, शास्त्रीय संगित व दृश्यात्मक कलांमधील थोर व्यक्ती, राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या थोर व्यक्ती, आरोग्य, विज्ञान, अर्थकारण, पत्रकारिता, विधी, शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, इत्यादी क्षेत्रातील मान्यवरांना पाचारण करण्यात येईल. बैठकीमध्ये 'महाराष्ट्र काल आज व उद्या' यावर चर्चा करुन मान्यवरांचे मार्गदर्शन घेण्यात येईल. | विधीमंडळ सचिवालय व संसदीय कार्य विभाग | संसदीय कार्य विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | लाईट अँड साऊंड प्रोजेक्शन शो | गेट वे ऑफ इंडिया या वास्तूवर लेजर शो चे (लाईट अँड साऊंड प्रोजेक्शन) उद्घाटन करण्यात येईल. ५ वर्षे निरंतर सुरु राहणाऱ्या या लेजर शोचे रोज सायंकाळी अर्धा तास प्रोजेक्शन करण्यात येईल. यामधून 'मी मुंबई बोलतेय', 'महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक वारसा', 'महाराष्ट्राची चौफेर प्रगती' व 'महाराष्ट्राचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान' यावर प्रकाश टाकण्यात येईल. ठराविक कालावधीनंतर विषयांची पुनर्रचना करुन नवीन विषय प्रोजेक्शनमध्ये दाखविण्यात येतील. आधुनिक तंत्रज्ञान व मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करुन हा शो विविध भाषांत अनुभवता येईल. यासाठीच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे. | सांस्कृतिक कार्य संचालनालय | सांस्कृतिक कार्य विभाग |
| ५ | गिरगाव चौपाटीवर आकर्षक विद्युत रोषणाई | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त गिरगाव चौपाटी येथे व शक्य झाल्यास वरळी-वांद्रे सीलिंक सारख्या महत्वाच्या वर्दळीच्या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येईल. | सांस्कृतिक कार्य संचालनालय | सांस्कृतिक कार्य विभाग |
| ६ | कॉफीटेबल बूक प्रकाशन | महाराष्ट्रातील भारतरत्न विजेते व महाराष्ट्रभूषण पूरस्कार प्राप्त मान्यवर व्यक्तीमत्वांचे दर्शन घडविणाऱ्या सचित्र कॉफीटेबल बूकचे अनावरण करण्यात येईल. | सांस्कृतिक कार्य संचालनालय | सांस्कृतिक कार्य विभाग |
| ७ | **महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कॉफीटेबल बुक** | महाराष्ट्रातील प्रथमपासून ते आतापर्यंतचे मुख्यमंत्री यांच्या कार्याचा आढावा घेणारे सचित्र कॉफीटेबल बूकचे अनावरण करण्यात येईल. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यांच्यापासून हा प्रवास सुरु होईल ते आजतागायत | सांस्कृतिक कार्य संचालनालय | **सांस्कृतिक कार्य विभाग** |
| ८ | **हीरक महोत्सवी महाराष्ट्र निमित्त ६० मान्यवरांच्या ६० लेखांच्या ग्रंथाचे प्रकाशन.** | महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस ६० वर्ष पुर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर हीरक महोत्सवी महाराष्ट्र निमित्त आजपर्यंतची महाराष्ट्राची प्रगती, सर्वांगीन प्रगतीचा लेखाजोखा यावर अधारित राज्यातील ६० मान्यवर लेखक/ संपादक यांच्या ६० लेखाचे प्रकाशन करण्यात येईल. | सांस्कृतिक कार्य संचालनालय | **सांस्कृतिक कार्य विभाग** |

## (शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. १६१/सां.का.४ दि. ३० जून, २०२२ सोबतचे परिशिष्ट)

## "स्वराज्य महोत्सव " अंतर्गत जिल्हा स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन

## परिशिष्ट – ब

(मा. जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली सदर उपक्रम राबविण्यात यावा.)

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा |
|---|---|---|
| १. | **हुतात्मा स्मारके सुशोभीकरण** | जिल्ह्यातील सर्व हुतात्मा स्मारकांचे सुशोभिकरण करण्यात यावे. |
| २. | **स्थानिक स्वराज संस्था विशेष सभा** | जिल्ह्यांतर्गत नगरपालिका/ महानगरपालिका /जिल्हापरिषद / नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विशेष सभांचे आयोजन करण्यात यावे |
| ३. | **जिल्हा ठिकाणी तिरंगा बलून सोडणे** | स्वातंत्र्यदिनी जिल्हास्तरावरुन मुख्यालयाच्या ठिकाणी तिरंगी रंगाचे बलुन आकाशात सोडणे अपेक्षित आहे. |
| ४. | **रस्ते संग्रहालय** | जिल्ह्यातील अनाम वीर,स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मे यांचे दुर्मिळ फोटो व त्याच्या कार्याची माहिती गावातील रत्याच्या कडेला लावण्यात यावी. |
| ५. | **डिस्ट्रिक्ट डिजिटल रिपॉसिटरी** | जिल्ह्यातील स्वातंत्र्यकालीन माहिती अथवा ऐतिहासिक ठिकाणची माहिती तयार करण्यात यावी. |
| ६. | **फ्रिडम जॉईन (प्रभात फेरी)** | स्वातंत्र्यदिनी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे. या प्रभात फेरीत सर्वाचा सहभाग करुन घ्यावा. |
| ७. | **७५ फुट उंचीचा राष्ट्रध्वज** | जिल्ह्याच्या मुख्यालयी ७५ फुट उंच राष्ट्रध्वज उभारण्यात यावा |
| ८. | **एन सी सी/ एनएस एस सायक्लोथॉन /मॅरेथॉन** | स्वातंत्र्यदिनी एन.सी.सी./ एन.एस.एस. कॅडेट चे संचलन करण्यात यावे. तसेच सायक्लोथॉन, मॅरेथॉनचे जिल्ह्याच्या मुख्यालयी आयोजन करण्यात यावे. |
| ९. | **विविध स्पर्धा निबंध/ वक्तृत्व/ चित्रकला** | शालेय/महाविद्यालय स्तरावरुन विविध स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. |
| १० | **वारसा स्थळ पदयात्रा** | जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणी पदयात्रा काढण्यात यावी. |
| ११ | **प्रदर्शने** | जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात यावे. |
| १२ | **हर घर तिरंगा** | ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त प्रत्येक नागरिकाने आजादी का अमृत महोत्सव हर घर तिरंगा या उपक्रमात सहभागी होणे आवश्यक राहील. |
| १३ | **विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम** | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील विद्यापीठात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. (कार्यशाळा/चर्चासत्रे/विविध स्पर्धा/जाणीव जागृती इ.) |
| १४ | **अनसंग हिरो बुकलेट** | जिल्ह्यातील अनाम वीर, हुतात्मा, शहिद यांची माहिती सह सचित्र अनसंग हिरो बुकलेट तयार करण्यात यावी. |
| १५ | **सांस्कृतिक कार्यक्रम** | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. |
| १६ | **आजादी का अमृत महोत्सव आकाम (AKAM) लोगो शासकीय इमारतीवर लावणे** | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील शासकीय इमारतींवर आजादी का अमृत महोत्सवी लोगो लावावा. |

| | | |
|---|---|---|
| १७ | **पुरातत्व दृष्ट्या महत्वाची स्थळे स्वच्छता** | जिल्ह्यातील पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वारसा स्थळांची स्वच्छता करण्यात यावी. |
| १८ | **कार्यालयांची स्वच्छता** | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त कार्यालयांची स्वच्छता करण्यात यावी. |
| १९ | **पुरातत्व/वारसास्थळे दत्तक योजना** | जिल्ह्यातील पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वारसा स्थळे देखभाल करण्याकरिता ऐतिहासिक वारसा जपवणूक करणाऱ्या संस्थाना दत्तक देण्यात यावी. |
| २० | **संविधान स्तंभ** | जिल्ह्याच्या मुख्यालयी संविधान स्तंभाची उभारणी करण्यात यावी. |
| २१ | **लामणदिवा** | जिल्ह्याच्या मुख्यालयी शासनमान्य लामणदिवा लावणे अपेक्षित आहे. |

**(शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. १६१/सां.का.४, दि. ३० जून, २०२२ सोबतचे परिशिष्ट)**
**"स्वराज्य महोत्सव " अंतर्गत तालुका स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन**

## परिशिष्ट – क

(तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली सदर उपक्रम राबविण्यात यावा.)

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा |
|---|---|---|
| १. | **स्थानिक स्वराज्य संस्था विशेष सभा** | स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विशेष सभांचे आयोजन करण्यात यावे. |
| २. | **वृक्षारोपण / वृक्ष लागवड** | तालुकास्तरावर शासकीय कार्यालयात वृक्षारोपन करण्यात यावे. |
| ३. | **वारसास्थळ /पुरातत्व दत्तक योजना** | तालुक्यातील पुरातत्वदृट्या महत्वाच्या वारसा स्थळे देखभाल करण्याकरिता ऐतिहासिक वारसा जपवणूक करण्याऱ्या संस्थाना दत्तक देण्यात यावी. |
| ४ | **७५ फुट उंचीचा राष्ट्रध्वज** | तालुक्याच्या मुख्यालयी ७५ फुट उंच राष्ट्रध्वज उभारण्यात यावा |
| ५ | **विविध स्पर्धा** | शालेय/महाविद्यालय स्तरावरुन विविध स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. |
| ६ | **सांस्कृतिक कार्यक्रम** | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. |
| ७ | **आकाम लोगो** ( AKAM Logo ) | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त तालुक्यातील शासकीय इमारतीवर आजादी का अमृत महोत्सवी लोगो लावावा. |
| ८ | **स्वच्छता मोहिम** | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त कार्यालयांची स्वच्छता करण्यात यावी. |
| ९ | **संविधान स्तंभ** | तालुक्याच्या मुख्यालयी संविधान स्तंभाची उभारणी करणे अपेक्षित आहे. |

**(शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. १६१/सां.का.४, दि.३० जून, २०२२ सोबतचे परिशिष्ट)**

## "स्वराज्य महोत्सव " अंतर्गत वार्ड / ग्राम स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन

## परिशिष्ट - ड

(तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली सदर उपक्रम राबविण्यात यावा.)

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा | अमंलबजावणी करणारे अधिकारी / कर्मचारी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | दिनांक ८ ऑगस्ट २०२२ | विशेष ग्रामसभा/ वार्ड सभा | दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी प्रत्येक ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात येईल. या ग्रामसभेत आजादी का अमृत महोत्सव या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत प्रत्येक नागरिकाने करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर निवेदन प्रस्तुत करण्यात येईल. दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधी दरम्यान स्वराज्य महोत्सव तयारीसाठी ग्रामस्थ व प्रशासन यांनी कोणत्या गोष्टी करायच्या यावर चर्चा होईल. 'हर घर झंडा' हा उपक्रम प्रत्येक नागरिक राबवेल, याविषयी ग्रामसभेत सुचना देण्यात येतील. या उपक्रमांतर्गत देशपातळीवर, राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर सुरू असलेल्या कार्यक्रमांची माहिती देण्यात येईल. अमृत महोत्सवाचे महत्व विशद करून त्यामध्ये विशेषत्वाने ज्येष्ठ नागरिक स्त्रिया विद्यार्थी यांनी सहभाग घेण्याबाबत आवाहन करण्यात येईल.झेंडयाच्या उपलब्धतेविषयी माहिती देण्यात येईल. | ग्रामसेवक, | गट विकास अधिकारी |
| | | | | वार्ड अधिकारी | नगर पालिका / महानगर पालिका |
| २ | दिनांक ९ ऑगस्ट २०२२ | हर घर तिरंगा/ सडा - रांगोळी / घराला तोरण/ प्रभात फेरी | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त ग्रामसभेत चर्चा व ठराव झाल्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाने आजादी का अमृत महोत्सव उपक्रमात सहभागी होणे आवश्यक राहील. | सर्व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |
| | | | प्रत्येक नागरिकाने घरासमोर सडा-रांगोळी करावी, घराला तोरण बांधावे, घरावर तिरंगा झेंडा फडकवावा आणि गावातील प्रत्येक कार्यक्रमात सहभागी व्हावे.<br>हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत गावातील प्रत्येक घरावर भारताचा तिरंगा फडकवला जाईल यासाठी ग्रामपंचायतीने पुरेशा राष्ट्रध्वजांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रध्वज विकत घेऊन आपल्या घरावर फडकवा, सदर राष्ट्रध्वजाची संहिता लक्षात घेऊन प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकवणे अपेक्षित आहे. | गृहिणी | ग्रामपंचायत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | दिनांक ९ ऑगस्ट २०२२ | स्वातंत्र्य सैनिकांचे मार्गदर्शन | गावातील वृद्ध ज्येष्ठ नागरिक व स्वातंत्र्य सैनिकांचे मार्गदर्शन अमृत महोत्सव औचित्य साधून गावातील ज्येष्ठ मंडळींनी व स्वातंत्र्यसैनिकांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. यासाठी गावातील जेष्ठ मंडळींना एकत्र बोलावून त्यांचा सत्कार करणे तसेच स्वातंत्र्याशी निगडित व्यक्तीने पाचारण करुन त्यांचाही सत्कार करणे अपेक्षित आहे. स्वातंत्र्यासाठी योगदान दिलेले स्वातंत्र्यसैनिक तसेच कारावास भोगावा लागणा-या स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांच्या घरी भेट देऊन कृतज्ञता व्यक्त करावी. | ग्रामसेवक, सरपंच, वार्ड अधिकारी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षिक, विदयार्थी व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |
| ४ | दिनांक १० ऑगस्ट २०२२ | स्वच्छता मोहीम | शालेय विद्यार्थी, युवक मंडळे, महिला मंडळे तसेच ग्रामपंचायत / वार्ड स्तरावरील अधिकारी कर्मचारी आणि शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सहभागातून स्वच्छता मोहीम राबवावी. गावातील महत्त्वाची सार्वजनिक ठिकाणे वारसास्थळे व महत्त्वाच्या वास्तू या ठिकाणीची स्वच्छता करून सुशोभीकरण करावे. | ग्रामसेवक व संरपंच, स्वच्छता दूत ग्रामस्थ | गटविकास अधिकारी/ तहसिलदार |
| ५ | दिनांक १० ऑगस्ट २०२२ | महिला मेळावे | आजादी का अमृत महोत्सव या पार्श्वभूमीवर गाव / वार्ड यामध्ये महिला मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे. यासाठी अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा वर्कर, शाळेतील शिक्षिका यांनी पुढाकार घ्यावा. सदर महिला मेळाव्यातून भारतीय स्वातंत्र्या विषयी मार्गदर्शन करावे, स्वातंत्र्य मिळवण्यामध्ये महिलांचे योगदान कसे होते, याचीही माहिती द्यावी. | अंगणवाडी सेविका / आशा वर्कर, शिक्षिका | ग्रामपंचायत |
| ६ | दिनांक ११ ऑगस्ट २०२२ | महिला बचत गट : मार्गदर्शन | गावातील वार्डातील महिलांचे बचत गट असतील त्यांचे मेळावे ग्रामस्तरावर घेण्यात यावेत. ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समितीचे अधिकारी यांनी या मेळाव्याला उपस्थिती लावावी. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना कोठे बाजारपेठ उपलब्ध होईल? त्यांना बँकांकडून पत पुरवठा कसा होईल? याबाबत मार्गदर्शन करावे. | अंगणवाडी सेविका, आशा वर्कर | ग्रामपंचायत |
| ७ | दिनांक ११ ऑगस्ट २०२२ | गावाचा इतिहास राष्ट्राचा इतिहास | प्रत्येक गावाला स्वतःचा एक इतिहास असतो, त्या इतिहासाची माहिती तरुण पिढीला असणे आवश्यक आहे. यामध्ये सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक साधन संपत्ती याबाबतची माहिती नोंद करणे अपेक्षित आहे. सदर माहिती नोंद करण्याची प्रक्रिया विद्यार्थी स्तरावरुन करण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांचे गट तयार करून त्यांना प्रश्नावली देण्यात येईल. सदरची प्रश्नावली घेऊन विद्यार्थी गावातील ज्येष्ठांकडे जातील आणि यांच्याकडून गावच्या इतिहासाबद्दल जाणून घेतील. शंभर वर्षापूर्वी गाव कसे होते्? गावातील नैसर्गिक साधन संपत्ती कशी होती ? पाण्याचे स्त्रोत कसे होते? प्राणी जीवन कसे होते? वातावरण कसे होते? दुष्काळ पडला होता का? ब्रिटिश कालावधीमध्ये गावची परिस्थिती कशी होती? गावातून कोणी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते का? गावातील थोर व्यक्ती व परिसरात घडलेल्या | मुख्याध्यापक , विदयार्थी व जेष्ठ नागरिक | ग्रामपंचायत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्वातंत्र्य लढ्याच्या विशेष घटना, गावातील कलाकार कलासमुह यांची नांवे, गावची बदलती आर्थिक परिस्थिती, गावातील समाजिक सलोखा, गावातील वेगवेगळे उत्सव/ महोत्सव/ विधी गावात खेळले जाणारे ग्रामीण खेळ, गावच्या मौखिक परंपरा, जत्रा-यात्रा/ उत्सव/ महोत्सव, गावातील अर्थकारण याबाबतची माहिती ज्येष्ठांकडून आणि जाणकारांकडून प्राप्त करून घेण्यात येईल. या माहितीमधील सर्व संमती असलेल्या भागास मान्यता देऊन ही पुस्तिका सर्वत्र वाटण्यात येईल. | | |
| ८ | दिनांक १२ ऑगस्ट २०२२ | मोबाईल दुष्परिणाम : मार्गदर्शन-चर्चा | हल्ली मोबाईल वापरण्याचे प्रमाण कमालीचे वाढले असून, त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. ऑनलाइन फसवणूक, ब्लॅकमेलिंग, आर्थिक फसवणूक या बाबींची माहिती देण्यासाठी गावातील ग्रामस्थांशी संवाद साधावा. मोबाईल मुळे होणारे आरोग्यावरील दुष्परिणाम, मुलांच्या अभ्यासावर होणारा परिणाम आणि अनावश्यक बाबींमुळे वाया जाणारा वेळ याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात यावे. | आरोग्य अधिकारी व संगणक तज्ञ | ग्रामपंचायत |
| ९ | दिनांक १२ ऑगस्ट २०२२ | अर्थ साक्षरता विषयक शिबीर | गावातील ग्रामस्थ व महिला यांच्यासाठी अर्थसाक्षरता विषयक शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. यासाठी बँका, पतसंस्था तसेच वाणिज्य यंत्रणे मधील व्यक्तीने मार्गदर्शन करावे, बचतीचे महत्त्व ऑनलाईन खरेदी, फसवणूका याबाबतही मार्गदर्शन करावे. | बँक अधिकारी/ पतसंस्था अधिकारी | ग्रामपंचायत |
| १० | दिनांक १३ ऑगस्ट २०२२ | गोपाळांची पंगत | गावातील अंगणवाडीत अनौपचारिक शिक्षण घेणाऱ्या बालकांसाठी गोपाळांची पंगत हा उपक्रम हाती घेण्यात येईल. गावातील दानशूर व्यक्ती मार्फत शाळेतील / अंगणवाडीतील बालकांना सकस अन्नधान्य देण्यात येईल. सात दिवस सलग फळांची पंगत हा उपक्रम गावातील अन्नदाते यांच्या माध्यमातून राबविण्यात येईल. यासाठी अन्नदात्यांच्या उपस्थितीत गोपाळाची पंगत आयोजित करण्यात येईल. | दानशुर व्यक्ती | ग्रामपंचायत |
| ११ | दिनांक १३ ऑगस्ट २०२२ | सेंद्रिय शेती: मार्गदर्शन | जमिनीचे आरोग्य सुधारणे व जमिन विषमुक्त होण्यासाठी व सेंद्रिय अन्नधान्य टिकवण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे. या कार्यशाळेत कीटकनाशके, तणनाशके, सेंद्रिय खते, रासायनिक खते यांचा जमिनीवर व माणसाच्या आरोग्यावर होणारा परिणाम याबाबत जाणीव जागृती करण्यात येईल. देशी वाण, जैविक कीड नियंत्रण, अन्नप्रक्रिया, भाजीपाला प्रक्रिया याबद्दल मार्गदर्शन करण्यात येईल. | सर्व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |
| १२ | दिनांक १३ ऑगस्ट २०२२ | शेतकरी मेळावे : मार्गदर्शन | गावातील शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करावा. यासाठी ग्रामसेवक तलाठी व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घ्यावा. तालुका स्तरीय कृषी कार्यालयातील अधिकारी यांनी गावे वाटप करून प्रत्येक ग्रामपंचायतीत एक अधिकारी जाईल किंवा कर्मचारी जाईल, याची दक्षता घ्यावी रासायनिक खते, | सर्व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कीटकनाशके यांच्या अतिरेकी वापरामुळे होणारे जमिनीचे नुकसान, बाजार भाव, हवामान अंदाज या विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. | | |
| १३ | दिनांक १४ ऑगस्ट २०२२ | पर्यावरण संवर्धन शपथ | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये, वृक्षलागवड करावी आणि प्लास्टिक बंदी करावी यासाठी सर्वांनी शपथ घेणे अपेक्षित आहे.<br>‘ आम्ही गावकरी शपथ घेतो की आम्ही निसर्गाचे रक्षण करू प्लास्टिक वस्तू वापरणार नाही, वृक्ष लागवड करून आणि त्याचे संवर्धन करू तसेच वृक्षतोड, शिकार, वनवा यापासून निसर्गाला वाचवू ’ पर्यावरण शपथ गावातील सर्व ग्रामस्थ व विद्यार्थी घेतील. | ग्रामसेवक, वन, कृषी विभाग, सर्व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |
| १४ | दिनांक १४ ऑगस्ट २०२२ | वृक्षारोपण | ऑगस्ट महिन्यामध्ये पावसाळा मध्यावर आलेला असतो, त्यामुळे या कालावधीत वृक्षारोपण कार्यक्रम सर्व ग्रामपंचायतीनी हाती घ्यावा. वृक्षारोपणासाठी इंडेमिक वनस्पतींचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा. सामाजिक वनीकरण विभागाने वनस्पतींची रोपे पुरवण्याची जबाबदारी स्वीकारावी. प्रत्येक ग्रामपंचायतीने कमीत कमी ७५० वृक्षांची लागवड करावी. वृक्ष लागवडी नंतर संवर्धनासाठी ही झाडे गावातील युवक मंडळे, विद्यार्थी, महिला बचत गट यांना दत्तक देण्यात यावीत. | ग्रामसेवक, वन, कृषी विभाग, शिक्षक विदयार्थी व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |
| १५ | दिनांक १५ ऑगस्ट २०२२ | प्रभात फेरी | गावातील शालेय मुलांच्या व महाविद्यालयीन मुलांच्या माध्यमातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे. सकाळी ७.०० वाजता सदरील प्रभातफेरी सुरू होईल. गावातील प्रमुख रस्त्यावरून ही प्रभात फेरी मार्गक्रमण करेल, यावेळेस विद्यार्थ्यांच्या हातात गावातील क्रांतिकारकांची नावे असणारे फलक, अनसंग हीरो यांची नावे / फोटो असणारे फलक देण्यात येतील. | शाळा / महाविद्यालय, शासकीय / निमशासकीय कार्यालय व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |
| १६ | दिनांक १५ ऑगस्ट २०२२ | शालेय स्पर्धा | गावातील युवती -युवक शालेय विद्यार्थी महिला यांच्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये प्रश्नमंजुषा, पारंपारिक खेळ यासारख्या स्पर्धांचा विचार करण्यात यावा. | शिक्षक व विदयार्थी, सर्व ग्रामस्थ | ग्रामपंचायत |
| १७ | दिनांक १६ ऑगस्ट २०२२ | किशोरी मेळावे | गावातील अंगणवाडी सेविका /मदतनीस, आशा वर्कर व वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित तज्ञ यांच्या सहभागातून किशोरी मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे. आरोग्य विषयक माहिती तसेच समुपदेशन यामध्ये अंतर्भूत असावे. योग्य व सकस आहार बालविवाहाचे दुष्परिणाम यावरही अशा मेळाव्यातून चर्चा करण्यात यावी. | वैद्यकीय अधिकारी / समुपदेशक | ग्रामपंचायत |
| १८ | दिनांक १६ ऑगस्ट २०२२ | सांस्कृतिक कार्यक्रम प्रबोधन / देशभक्तिपर कार्यक्रम / स्वराज्य फेरी | गावातील लोककलाकार, किर्तनकार तसेच प्रबोधनकार यांना देशभक्तिपर विचारांचा कार्यक्रम सादर करण्यास प्रेरित करावे, यामधून सर्व ग्रामस्थाना लोककलेविषयी, कलाकाराविषयी माहिती होईल. तसेच देशभक्तिपर विचार- प्रबोधनाचा / स्फुर्तीदायक गीत गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम | सर्व ग्रामस्थ लोककलाकार प्रबोधनकार विदयार्थी व शिक्षक | ग्रामपंचायत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आयोजित करण्यात यावा. | | |
| १९ | दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ | स्वराज्य महोत्सव सांगता समारोह स्वराज्य फेरी, देशभक्तिपर चित्रपट दाखविणे | स्वराज्य महोत्सव सांगता समारोह करताना प्रभात फेरीचे आयोजन करावे. देशभक्तिपर स्फुर्तीदायक गीत गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम, शाळेत / महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे तसेच देशभक्तिपर स्फुर्तीदायक चित्रपट दाखविणे. | सर्व ग्रामस्थ कलाकार विद्यार्थी व शिक्षक | ग्रामपंचायत |

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मुख्य इमारत, अभिलेख कक्ष, रुम नं. २२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०००३२

ईमेल-द्वारे
दुरध्वनी क्र. ०२२ - २२०२ ५६०७ Email ID : tca-mh@nic.in

क्रमांक : संकीर्ण ८२२२/प्र. क्र.७ (भाग-१)/सां.का. ४ दिनांक : ७ जुलै, २०२२

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
२. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य
३. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
४. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
६. सर्व आयुक्त, महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य

7-07-2022
211
NSS/DSD

विषय :- मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली VC द्वारे बैठक
१) "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा
२) "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा आढावा

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली विषयाधीन उपक्रमांवर तातडीने कार्यवाही होण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे खालीलप्रमाणे बैठक आयोजित केलेली आहे :-

| | |
|---|---|
| चर्चेचे विषय | १) "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा<br>२) "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा आढावा<br>३) मा. अध्यक्ष महोदयांच्या मान्यतेने आयत्यावेळीचे विषय |
| वार व दिनांक | शुक्रवार, दिनांक ८ जुलै, २०२२ |
| वेळ | दुपारी ३.०० वाजता |
| स्थळ | मा. मुख्य सचिव यांचे दालन, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई |
| निमंत्रित | १. मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| | २. मा. अप्पर मुख्य सचिव, सामाजिक न्याय विभाग |
| | ३. मा. अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग |
| | ४. मा. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग |
| | ५. मा. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग |
| | ६. मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग |
| | ७. मा. अप्पर मुख्य सचिव, उद्योग विभाग |

NSS/DSD
7/7/22

| | |
|---|---|
| | ८. मा. अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग |
| | ९. मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| | १०.मा. अप्पर मुख्य सचिव, परिवहन व बंदरे विभाग |
| | ११.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| | १२.मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग |
| | १३.मा. प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग |
| | १४.मा. प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| | १५.मा. प्रधान सचिव, राजशिष्टाचार विभाग |
| | १६.मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग |
| | १७.मा. सचिव, वैद्यकिय शिक्षण / सांस्कृतिक कार्य विभाग |
| | १८.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य, खादी व ग्रामोद्योग मंडळ |
| | १९.संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई, सम्नवयक अधिकारी |

२. सदर बैठकीस मंत्रालयीन विभागांच्या सचिवांनी प्रत्यक्ष व इतर निमंत्रितांनी व्हिडीओ कॉन्फरसिंग बैठकीस उपस्थित रहावे ही विनंती, लॉगीन आयडी व पासवर्ड यथावकाश ईमेलवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(प्रसाद म. महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२. मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. मा. अप्पर मुख्य सचिव, सामाजिक न्याय विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. मा. अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५. मा. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. मा. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. मा. अप्पर मुख्य सचिव, उद्योग विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९. मा. अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०.मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
११.मा. अप्पर मुख्य सचिव, परिवहन व बंदरे विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१३.मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४.मा. प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१५.मा. प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१६.मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१७.मा. प्रधान सचिव, राजशिष्टाचार विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

१८.मा. सचिव, वैद्यकिय शिक्षण/सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य, खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई
२०.संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, सदर बैठकीमधील चर्चेच्या विषयासंबंधीत टिप्पणी/सादरीकरणाच्या प्रती मा. सचिव (सां.का.)/उप सचिव (सां.का.४) यांना आगाऊ स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच सदर बैठकीचे इतिवृत्त घेण्यासाठी लघुलेखकाची व्यवस्था करावी व बैठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी दोन दिवसात सादर करावे.
२१.निवड नस्ती (सां.का.४)

# जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. (0231)2665813 ई-मेल-rdckop@gmail.com

क्र:कार्यासन१२/३/सा.प्र./कावि/२५३/२०२२ दिनांक:- ०८/०७/२०२२

प्रति,

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर. | ३६ | महा व्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र कोल्हापूर. |
| २ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद कोल्हापूर. | ३७ | सहा. आयुक्त कामगार कार्यालय कोल्हापूर. |
| ३ | मा. पोलीस अधिक्षक, कोल्हापूर. | ३८ | प्रादेशिक अधिकारी एम.आय.डी.सी. कोल्हापूर. |
| ४ | कुलसचिव शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर | ३९ | विभागीय नियंत्रक एस टी महामंडळ कोल्हापूर. |
| ५ | अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापूर. | ४० | उपआयुक्त पशूसंवर्धन कार्यालय, कोल्हापूर. |
| ६ | अधिक्षक अभियंता कोल्हापूर पाटबंधारे विभाग कोल्हापूर. | ४१ | मुख्य कार्यकारी अधिकारी कोल्हापूर महानगर प्राधिकरण विभाग, कोल्हापूर. |
| ७ | अधिक्षक अभियंता महवितरण व महापारेषण कोल्हापूर. | ४२ | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, कोल्हापूर. |
| ८ | कार्यकारी अभियंता पाठबंधारे (उभारणी) कोल्हापूर. | ४३ | अधिक्षक अभियंता पाटबंधारे (उभारणी), कोल्हापूर. |
| ९ | कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोल्हापूर. | ४४ | विभागीय सहनिबंधक कोल्हापूर. |
| १० | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), कोल्हापूर. | ४५ | कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (विदयुत), कोल्हापूर. |
| ११ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण), कोल्हापूर. | ४६ | सह. संचालक साखर, कोल्हापूर. |
| १२ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), कोल्हापूर. | ४७ | प्र. सह. निबंधक मुद्रांक, कोल्हापूर |
| १३ | शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर | ४८ | जिल्हा रेशीम उदयोग अधिकारी, कोल्हापूर. |
| १४ | अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर. | ४९ | कामगार कल्याण अधिकारी, कोल्हापूर. |
| १५ | प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूर | ५० | जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापूर. |
| १६ | जिल्हा शल्य चिकीत्सक कोल्हापूर. | ५१ | प्राचार्य .शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर. |
| १७ | अधिष्ठता मेडीकल कॉलेज कोल्हापूर. | ५२ | वरिष्ठ भूजल सर्वेक्षण अधिकारी कोल्हापूर. |
| १८ | सहा. आयुक्त समाजकल्याण विभाग कोल्हापूर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाबर हॉस्पिटल जवळ, विचारेमाळ, कोल्हापूर. | ५३ | जिल्हा हवामान अधिकारी, कोल्हापूर |
| १९ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कोल्हापूर. | ५४ | प्रबंधक बी.एस.एन.एल., कोल्हापूर. |
| २० | सह. संचालक उच्च शिक्षण विभाग कोल्हापूर. | ५५ | सहा. नियंत्रक वैदयमापन कोल्हापूर |
| २१ | उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर. | ५६ | व्यवस्थापक महाउर्जा कोल्हापूर |
| २२ | जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर. | ५७ | सचिव देवस्थान समिती कोल्हापूर. |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर | ५८ | उप वनसंरक्षण (प्रादेशिक) कोल्हापूर. |
| २४ | जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा., कोल्हापूर | ५९ | उपसंचालक आरोग्य विभाग कोल्हापूर. |
| २५ | जिल्हा उपनिबंधक सह. संस्था कोल्हापूर. | ६० | उपअभियंता गृह निर्माण व क्षेत्र विकास कोल्हापूर. |
| २६ | सह. जिल्हा निबंधक मुद्रांक कोल्हापूर. | ६१ | सहाय्यक संचालक औदयोगिक सुरक्षा कोल्हापूर. |
| २७ | सहा. आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास कोल्हापूर | ६२ | जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर |
| २८ | उपसंचालक शिक्षण विभाग कोल्हापूर. | ६३ | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कोल्हापूर. |
| २९ | प्रबंधक लिड बँक कोल्हापूर. | ६४ | कमांडर एन सी सी कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ परीसर |
| ३० | जिल्हा क्रिडा अधिकारी कोल्हापूर. | ६५ | संचालक, पुरातत्त्व विभाग कोल्हापूर. |
| ३१ | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोल्हापूर | ६६ | उपविभागीय अधिकारी, करवीर, राधानगरी, भूदरगड, इचलकरंजी, पन्हाळा, गडहिंग्लज |
| ३२ | सहा. संचालक नगररचना कोल्हापूर. | ६७ | तहसिलदार सर्व |
| ३३ | प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ कोल्हापूर. | ६८ | अपर चिटणीस , जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर. |
| ३४ | सहा. आयुक्त अन्न, औषध प्रशासन विभाग कोल्हापूर. | ६९ | तहसिलदार सर्वसाधारण |
| ३५ | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कोल्हापूर. | ७० | व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय कोल्हापूर. |
| | | ७१ | जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी कोल्हापूर |

**विषय :- "स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव" अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राबविण्याबाबत**

संदर्भ :- १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२८८/प्र..क्र.११० (भाग-२)/सां.का.४ दिनांक २० जून, २०२२

२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेकडील शासन निर्णय संकिर्ण ८२२२/ प्र.क्र. १६१/ सां. का. ४ , दिनांक ३० जून २०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१ चे परिपत्रकान्वये "आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णय नुसार "स्वराज्य महोत्सव" उपक्रम राज्यात दिनांक ९ ऑगस्ट, २०२२ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत जिल्हास्तरावर आयोजित करावयाच्या विविध उपक्रम /कार्यक्रम यांचे स्वरुप परिशिष्ट "क" मध्ये निश्चित केले आहे. त्यानुसार "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत विविध कार्यक्रम / उपक्रमाचे यशस्वीरित्या जास्तीत-जास्त जनसहभागातून आयोजन करणेचे आहे. त्याकरिता मा.जिल्हाधिकारीसो यांनी दिनांक ०८/०७/२०२२ रोजीचे बैठकी मध्ये दिलेल्या सुचनानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये आपले विभागाकडून करण्यात येणाऱ्या उपक्रम / कार्यक्रम यांचे नियोजन तसेच सविस्तर माहितीसह अहवाल **सोमवार दिनांक ११/०७/२०२२ रोजी दुपारी १२.०० पर्यंत** या कार्यालयाचे rdckop@gmail.com या ई-मेल वर पाठविण्यात यावे.

[signature] 08.07.22

( दत्तात्रय कवितके )

निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर

## "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत जिल्हा स्तरावरील कार्यक्रमांचे नियोजन

### परिशिष्ठ ब

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | हुतात्मा स्मारके सुशोभीकरण | जिल्हयातील सर्व हुतात्मा स्मारकांचे सुशोभिकरण करण्यात यावे. | अप्पर चिटणीस जिल्हाधिकरी कार्यालय कोल्हापूर |
| 2 | स्थानिक स्वराज संस्था विशेष सभा | जिल्हयांतर्गत नगरपालिका/ महानगरपालिका / जिल्हापरिषद / नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विशेष सभाचे आयोजन करण्यात यावे | को.म.न.पा. / जिल्हा परिषद |
| 3 | जिल्हा ठिकाणी तिरंगा बलून सोडणे | स्वातंत्र्यदिनी जिल्हास्तरावरुन मुख्यालयाच्या ठिकाणी तिरंगी रंगाचे बलून आकाशात सोडणे अपेक्षित आहे. | सार्व. बांधकाम विभाग |
| 4 | रस्ते संग्रहालय | जिल्हयातील अनाम वीर, स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मे यांचे दुर्मिळ फोटो व त्याच्या कार्याची माहिती गावातील रत्याच्या कडेला लावण्यात यावी. | को.म.न.पा. / जिल्हा परिषद./ सार्व. बांधकाम विभाग |
| 5 | डिस्ट्रिक्ट डिजिटल रिपॉसिटरी | जिल्हयातील स्वातंत्र्यकालीन माहिती अथवा ऐतिहासिक ठिकाणची माहिती तयार करण्यात यावी. | जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय |
| 6 | फ्रिडम जॉईन (प्रभात फेरी) | स्वातंत्र्यदिनी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे. या प्रभात फेरीत सर्वाचा सहभाग करून घ्यावा. | को.म.न.पा. / जिल्हा परिषद |
| 7 | ७५ फुट उंचीचा राष्ट्रध्वज | जिल्हयाच्या मुख्यालयी ७५ फुट उंच राष्ट्रध्वज उभारण्यात यावा | तहसिलदार सर्वसाधारण |
| 8 | एन सी सी / एनएसएस सायक्लोथॉन / मॅरेथॉन | तंत्र्यदिनी एन.सी.सी./ एन.एस.एस. कॅडेट चे संचलन करण्यात यावे. तसेच सायक्लोथॉन, मॅरेथॉनचे जिल्हयाच्या मुख्यालयी आयोजन करण्यात यावे. | एन.सी.सी./ शिवाजी विद्यापीठ |
| 9 | विविध स्पर्धा निबंध / वक्तृत्व/ चित्रकला | शालेय/ महाविद्यालय स्तरावरून विविध स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात यावे. | को.म.न.पा. / जिल्हा परिषद |
| 10 | वारसा स्थळ पदयात्रा | जिल्हयातील ऐतिहासिक ठिकाणी पदयात्रा काढण्यात यावी. | सर्व उपविभागीय अधिकारी / तहसिलदार |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | प्रदर्शने | जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात यावे. | जिल्हा माहिती कार्यालय |
| 12 | हर घर तिरंगा | ११ते१७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्यमहोत्सवानिमित्त प्रत्येक नागरिकाने आजादी का अमृत महोत्सव हर घर तिरंगा या उपक्रमात सहभागी होणे आवश्यक राहील. | जिल्हा माहिती कार्यालय |
| 13 | विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील विद्यापीठात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. (कार्यशाळा / चर्चासत्रे / विविध स्पर्धा/जाणीव जागृती इ.) | शिवाजी विद्यापीठ |
| 14 | अनसंग हिरो बुकलेट | जिल्ह्यातील अनाम वीर, हुतात्मा, शहिद यांची माहिती सह सचित्र अनसंग हिरो बुकलेट तयार करण्यात यावी. | जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय |
| 15 | सांस्कृतिक कार्यक्रम | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित । जिल्ह्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. | को.म.न.पा. / जिल्हा परिषद./ विद्यापीठ |
| 16 | आजादी का अमृत महोत्सव आकाम (AKAM) लोगो शासकीय इमारतीवर लावणे | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील शासकीय इमारतींवर आजादी का अमृत महोत्सवी लोगो लावावा. | सर्व विभाग |
| 17 | पुरातत्व दृष्ट्या महत्वाची स्थळे स्वच्छता | जिल्ह्यातील पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वारसा स्थळांची स्वच्छता करण्यात यावी. | पुरातत्व विभाग |
| 18 | कार्यालयांची स्वच्छता | ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त कार्यालयांची स्वच्छता करण्यात यावी. | सर्व विभाग / कार्यालये |
| 19 | पुरातत्व / वारसास्थळे दत्तक योजना | जिल्ह्यातील पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वारसा स्थळे देखभाल करण्याकरिता ऐतिहासिक वारसा जपवणूक करणाऱ्या संस्थाना दत्तक देण्यात यावी. | पुरातत्व विभाग |
| 20 | संविधान स्तंभ | जिल्ह्याच्या मुख्यालयी संविधान स्तंभाची उभारणी करण्यात यावी. | सार्व. बांधकाम विभाग |
| 21 | लामणदिवा | जिल्ह्याच्या मुख्यालयी शासनमान्य लामणदिवा लावणे अपेक्षित आहे. | सार्व. बांधकाम विभाग |